**ठळक बातम्या**

- अतिवृष्टीग्रस्त भागात नुकसानीची पाहणी करण्यासाठी मंत्र्यांचे दौरे सुरु / आवश्यक तिथे नियम शिथिल करुन तातडीने मदत देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

- प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ८२ लाख घरांचं बांधकाम  पूर्ण

- कृषी क्षेत्राने इंधन आणि उर्जानिर्मितीकडे वळणं देशासाठी गरजेचं असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

**आणि**

- बिल गेट्स फाऊंडेशनचा गोलकीपर्स चँपियन सन्मान ‘सर्च’ संस्थेचे संस्थापक डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांना प्रदान

**<><><><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागात नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्र्याचे दौरे सुरु झाले आहेत. मराठवाडा, सोलापूर, अहिल्यानगर इथं गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री बांधावर जाऊन पाहणी करत आहेत. आपत्तीच्या काळात आवश्यक तिथे नियम शिथिल करुन तातडीने मदत वितरित करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी **सोलापूर** जिल्ह्यात माढा तालुक्यातील निमगाव आणि सिना दारफळ या गावांना भेट देत पूरस्थितीची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. …

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

पुरात अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याचं काम एनडीआरएफनं चोख बजावल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तसंच घरात पाणी जाऊन नुकसान झालेल्या नागरिकांना ही अधिकचे नियम न लावता शासन मदत करेल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री आज लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांनाही भेट देणार आहेत.

**उपमुख्यमंत्री अजित पवार** यांनी आज सोलापूर जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाचा आढावा घेतला. आपद्ग्रस्तांशी संवाद साधत त्यांनी नुकसानभरपाईसाठी त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** हे देखील **धाराशिव** जिल्हाच्या दौऱ्यावर आहेत. **कृषीमंत्री दत्तात्रय भरणे** यांनी जालना जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागांचा दौरा करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. जालना जिल्ह्यातल्या पंचनाम्याचं काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

**जालन्याच्या** पालकमंत्री आणि ग्रामविकास मंत्री **पंकजा मुंडे** यांनी आज घन-सावंगी तालुक्यात भेट देऊन पाहणी केली. जलसंधारण आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री **गिरीश महाजन** यांनी मराठवाड्यात **धाराशिव**, बार्शी इथल्या पूरग्रस्त गावांचा दौरा करून आढावा घेतला.

**<><><><><><>**

मुसळधार पावसामुळे नद्यांचे प्रवाह वाढले असून राज्यातल्या अनेक जलाशयांमधून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. पैठणच्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९८ टक्क्यांवर गेला आहे. धरणात सध्या ६६ हजार ७६९ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक सुरु असून, विसर्ग कमी करण्यात आला आहे.

सध्या धरणातून १८ हजार ८६४ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

नांदेडमध्ये विष्णुपुरी प्रकल्पाचे १६ दरवाजे उघडण्यात आले आहेत. प्रकल्पातून अडीच लाख क्युसेक्स विसर्ग गोदावरी पात्रात केला जात आहे. नांदेड शहरातल्या अनेक सखल भागात पाणी शिरलं आहे. गोदावरी काठच्या शंभरहून अधिक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आलं आहे. **लातूर** जिल्ह्याच्या औसा तालुक्यात तेरणानदीचं पाणी काठच्या उजनी गावात शिरलं आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानं करमाळा, माढा, मोहोळ, अपर तहसील मंद्रूप, उत्तर सोलापूर या तालुक्यामध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानं पाण्याच्या खाली शोध कार्य करण्याच्या क्षमतेच्या ५ यांत्रिक बोटी, सोबत १५ व्यक्तींचं पथक आणि ४५ लाईफ जॅकेट, ५ रिंग उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**परभणी** जिल्ह्यात गोदावरी आणि दुधना नदीला पूर आला असून ३६ गावांचा संपर्क तुटला असून ५७८ नागरिकांना मदत पथकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केलं.जिल्ह्यात ५ लाख १८ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती,त्यातल्या १लाख ५१ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या सोयाबीन,कापूस,तूर, मूग,हळद यासह इतर पिकांचं नुकसान झालं. सप्टेंबर महिन्यात २८८ गावातल्या ६६ हजार ३४ हेक्टर वरच्या पिकांचे नुकसान झालं असून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ८२ लाख घरं बांधून पूर्ण झाली आहेत. ग्रामीण भागात सर्वांना पक्की घरं मिळवून देण्यासाठी २०१६ मधे ही योजना सुरु झाली. पात्र कुटुंबांना स्वयंपाकघर आणि शौचालय अशा सुविधांसह घरं मिळाल्यामुळे जीवनमान उंचावलं आहे.

**<><><><><><>**

कृषी क्षेत्राने इंधन आणि उर्जानिर्मितीकडे वळणं देशासाठी गरजेचं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. भारत जैव ऊर्जा आणि तंत्रज्ञानविषयक प्रदर्शनाच्या दुसऱ्या भागाचं उद्घाटन आज गडकरी यांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं. त्यावेळी ते बोलत होते. देशातली ४५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे आणि त्यांचा जीडीपीतला वाटा १४ टक्के आहे. शेतमालाला वाजवी दर मिळत नसल्यानं ग्रामीण भागात गरीबी आणि बेरोजगारीची समस्या असल्याचं ते म्हणाले. शेतीतून उर्जानिर्मितीच्या प्रयत्नांना चालना दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

झोपण्याच्या बर्थची सोय असलेल्या दोन वंदे भारत  गाड्या लौकरच प्रवाशांच्या सेवेत येतील असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यम प्रतिनिधींना सांगितलं. दिवाळी आणि छठ पूजा या सणांच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी  १२ हजार विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येतील असं वैष्णव यांनी सांगितलं. १ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर याकाळात ही सुविधा उपलब्ध राहील. यातल्या दीडशे गाड्या आवश्यकतेनुसार ऐनवेळी उपलब्ध करण्यासाठी तयार ठेवण्यात येतील, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

बिल गेट्स यांच्या गेट्स फाऊंडेशनचा गोलकिपर्स चँपियन्स सन्मान ‘सर्च’ संस्थेचे संस्थापक डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांना काल न्यू यॉर्क इथं झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. त्यांच्या वतीने आनंद बंग यांनी पुरस्कार स्वीकारला. बंग दांपत्यानं सार्वजनिक आरोग्य आणि विशेष करून बालमृत्यू रोखण्यासाठी केलेल्या कल्पक उपाययोजनांची दखल घेत हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.

**<><><><><><>**

देशातल्या तरुणांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली आहेत. आजच्या सेवा पर्व या विशेष मालिकेत जाणून घेऊ या सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या प्रगतीविषयी....

**व्हीसी**

*इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात सेमिकंडक्टर हा महत्त्वाचा घटक आहे. २०२१ मधे देशात सेमिकंडक्टर मिशनला सुरुवात झाल्यापासून भारताने या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे.  या महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या सेमिकॉन इंडिया २०२५ या कार्यक्रमाला संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सेमिकंडक्टर चीपचं वर्णन डिजिटल डायमंड  असं केलं होतं.*

**होल्ड बाईट मोदी**

*(सेमिकंडक्टर मिशन अंतर्गत ७६ हजार कोटी रुपयांचे सेमिकॉन इंडिया प्रोग्राम सुरू आहेत, तर डिझाईन लिंक्ड् इन्सेन्टिव्ह स्कीमद्वारे २८० पेक्षा जास्त शैक्षणिक संस्था आणि ७० पेक्षा जास्त स्टार्टअप्सना सामावून घेतलं आहे. सेमिकॉन इंडिया २०२५ मध्ये केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी भारतीय बनावटीच्या सेमिकंड्टर चीपचा पहिला संच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सुपूर्द केला. भारताच्या सेमिकंडक्टर निर्मितीच्यचा प्रवासातला हा मैलाचा दगड ठरला. सेमिकंडक्टर क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी हे अतिशय महत्त्वाचं पाऊल आहे.*

*त्यामुळे संपूर्ण जग आज भारताकडे  आशेने पाहत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.)*

**<><><><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. युवा वर्गाला याचा कसा फायदा होणार आहे हे जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून......

**व्हीसी**

*(व्यायामशाळा, फीटनेस सेंटर यांच्यावरचा जीएसटी १८ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय तरुण, तसंच चाकरमान्यांसाठी व्यायामाची साधनं सहज उपलब्ध होतील. केंद्र सरकारच्या फीट इंडिया चळवळीला प्रोत्साहन मिळेल आणि नागरिक आरोग्यदायी जीवन जगतील. दुचाकींवरचा जीएसटी २८ वरून १८ टक्के झाल्यामुळे कनिष्ठ मध्यमवर्गीय, छोट्या व्यावसायिकांना दुचाकी घेणं परवडेल. गिग वर्कर्सना दुचाकीची गरज सर्वाधिक असते. जीएसटी दर कमी  झाल्यामुळे गिग वर्कर्सना कमी किमतीत दुचाकी मिळतील आणि त्यांच्या पैशाची बचत होईल. छोट्या कारवरील जीएसटी दर कमी झाल्यामुळे निमशहरी भागात आणि छोट्या शहरांमधे कारची खरेदी वाढेल. याचा फायदा कार विक्रेते, तसंच टॅक्सी चालकांना होईल.)*

***//<><><><><><>//***